# रत्नागिरी जिल्हा तलाठी पदभरती - 2019

## उमेदवारांना सूचना

खालील प्रवर्गाची अंतरिम निवडसूची ही संबंधित विभागाकडून (क्रिडा व युवक सेवा विभाग व कौशल्य विकास रोजगार व उदयोजकता विभाग) कागदपत्र पडताळणी करणेचे अटीवर प्रसिध्द करण्यात आली होती. तथापि याबाबत कार्यवाही पूर्ण झाली असल्याने खालील प्रवर्गाची अंतिम निवडसूची दिनांक 05/08/2020 रोजी या कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे.

1. **इतर मागास वर्ग (खेळाडू)**
2. **इतर मागास वर्ग (अंशकालीन उमेदवार)**
3. **अनुसूचित जाती (अंशकालीन उमेदवार)**

शासन, वित्त विभाग यांजकडील दिनांक 04/05/2020 रोजीच्या शासन निर्णयामध्ये सार्वजनिक आरोग्य विभाग व वैदयकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग वगळता कोणत्याही विभागाने कोणत्याही प्रकारची नवीन पदभरती करु नये, असे निर्देश देण्यात आले आहेत.

सदर शासन निर्णयाचे अनुषंगाने जिल्हाधिकारी औरंगाबाद व जिल्हाधिकारी नांदेड यांजकडून तलाठी पदाकरीता निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्ती आदेश दयावे किंवा कसे? याबाबत शासनास मार्गदर्शनार्थ विनंती केली होती. सदर विनंतीस अनुसरुन त्याबाबतचा प्रस्ताव वित्त विभागास सादर करण्यात आला असता, वित्त विभागाने खालीलप्रमाणे निर्देश दिले असल्याचे शासन, महसूल व वन विभाग यांजकडील दिनांक 31/07/2020 रोजीच्या पत्रान्वये सर्व विभागीय आयुक्त यांना दिले आहेत.

***"जिल्हाधिकारी औरंगाबाद व जिल्हाधिकारी नांदेड यांनी विहित भरती प्रक्रिया अवलंबून अंतिम निवड यादी प्रसिध्द केली असली तरी सदर निवड यादीनुसार उमेदवारांना नियुक्ती देणे/ पदभरती करणे योग्य नाही.***

***सध्या दिनांक 04 मे, 2020 च्या शासन निर्णयानुसार पदभरती करु नये. पदभरतीवरील निर्बंध उठल्यानंतर पुढील निर्णय घेण्यात यावा. तसेच निवड यादी पुढील एक वर्षापर्यंत वापरण्याबाबत विभागाने सामान्य प्रशासन विभागाची मान्यता घ्यावी."***

सदर निर्देश पहाता, उपरोक्त संवर्गातील अंतिम निवडसूचीतील उमेदवारांची संबंधित उपविभागीय अधिकारी यांजकडे नियुक्तीसाठी शिफारस करणेची कार्यवाही तूर्त स्थगित ठेवण्यात येत आहे.

<u>ठिकाण :</u> रत्नागिरी
<u>दिनांक :</u> 03/09/2020

**(लक्ष्मीनारायण मिश्रा) भाप्रसे**
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा निवड समिती, रत्नागिरी**